● शुक्रवार, दि. ६ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १२८ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# देवेंद्रपर्वास सुरुवात!

## ऐतिहासिक आझाद मैदानात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला शपथविधी










**मुंबई । प्रतिनिधी** - राज्याचे ३१ वे मुख्यमंत्री म्हणून राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीयमंत्री, दिग्गज भाजपा नेते, बॉलिवूड सेलिब्रिटी, क्रिकेटर्स, उद्योगपती, आमदार, खासदार आणि हजारो कार्यकर्त्यांच्या साक्षीने ऐतिहासिक आझाद मैदानावर झालेल्या शपथविधी सम ारंभात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यासम वेत उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, अजित आशाताई अनंतराव पवार यांना राज्यपालांनी पद आणि गोपनियतेची शपथ दिली. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी शपथविधी सोहळ्याचे संचलन केले.

विधानसभा निवडणुकीत भाजपने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मोठा विजय मिळवला, महायुतीला राज्यात २३७ जागांवर यश मिळत स्पष्ट बहुमत मिळालं. त्यामध्ये, १३२ जागांसह भाजप हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यामुळे, भाजप नेताच मुख्यमंत्रीपदी शपथ घेणार हे जवळपास निश्चित होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शिवसेना नेते एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा होती. त्यामुळे ते उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार की नाही याबाबत सस्पेन्स होता. अखेर एकनाथ शिंदे यांचीही नाराजी दूर झाली असून त्यांनीही उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यामुळे, राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार स्थापन झालं असून लवकरच मंत्रिमंडळ विस्तार होणार असल्याची माहिती आहे.

भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांची भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आल्याची घोषणा केली, तेव्हाच मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस हेच भाजपचा चेहरा असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे, गावागावात, म तदारसंघात आणि संपूर्ण महाराष्ट्रात भाजप समर्थक व कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. त्यानंतर, नियोजित वेळ आणि तारखेनुसार आज शपथविधीचा सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.



आजच्या शपथविधी कार्यक्रमास मंचावर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय आरोग्यमंत्री जगतप्रकाश नड्डा, केंद्रीय भूपृष्ठ परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषि मंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पियुष गोयल, केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर, केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंदर यादव, केंद्रीय माहिती तंत्रज्ञान व रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, रामदास आठवले यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री व आसाम, छत्तीसगढ, गोवा, गुजरात, हरियाणा, मध्यप्रदेश, मेघालय, राजस्थान, त्रिपुरा, उत्तराखंड, पाँडेचरी, ओडिशा, मणिपूर, नागालँड, सिक्कीमचे मुख्यमंत्री संत, महंत, विविध धर्मांचे गुरु, राज्यातील खासदार, आमदार, विविध राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते, उद्योग, क्रीडा, मनोरंजन क्षेत्रातील विविध मान्यवर, विशेष निमंत्रित अतिथी उपस्थित होते. शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्य गीताने करण्यात आली.

---

युवा आदर्श

### डॉक्टर आंबेडकर ...

चैत्य भूमीचे स्मारक
जागे बंधुत्व संवेदना
बाबा आपणांत नाही
मना अत्यंतिक वेदना
डॉक्टर विद्याविभूषित
अखंडित ज्ञानसाधना
आदर्श शिक्षकमानक
दिव्य द्रष्टा संशोधना
चरित्र आपले वाचता
चालना प्राप्त वाचना
आत्मनिर्भर सक्षम हो
कशास सहाय्य याचना
सर्व समावेशक केली
भारतीय राज्य घटना
संविधानी लोकशाही
माणूसकीची संघटना
सनातनी रितीरुढींनी
केली अति संभावना
स्वातंत्र्य किंमत कळे
जागृत होई सद्भावना
ज्ञान तेज नीलसूर्याचे
लाजवी कैक विद्वाना
पत्रकारिता सळाळती
सुशांत केल्या वल्गना

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

## लाडकी बहीण योजना सुरुच राहणार - देवेंद्र फडणवीस

**मुंबई** - सत्ता स्थापनेनंतर लाडक्या बहिणींवर काही निर्णय होतो का याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष असताना मुख्यमंत्री पदावर बसल्यानंतर पहिल्याच पत्रकार परिषदेत देवेंद्र फडणवीस यांनी लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार असल्याचं सांगितलंय . महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर १२ दिवसांनी देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. निवडणुकीनंतर राज्यात पुन्हा सत्ता मिळाल्यास लाडकी बहीण योजनेच्या १५०० रुपयांऐवजी २१०० महिलांना देऊ असा आश्वासन महायुतीने प्रचारादरम्यान दिलं होतं . लाडकी बहीण योजना सुरूच राहणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २१०० रुपये देणार असल्याचं पत्रकार परिषदेत ते म्हणाले आहेत . 'बजेटच्या वेळेस यासंदर्भात विचार करू . आमचे आर्थिक स्त्रोत यांच्याशी विचारविनिमय करून हा निर्णय घेण्यात येणार' असल्याचं फडणवीस म्हणाले.

'जी आश्वासन दिली आहेत ती पूर्ण करू. ही आश्वासन पूर्ण करण्यासाठी जी व्यवस्था करावी लागते ती आधी करू. निकषाच्या बाहेर कोणी भेटला, तक्रारी आल्या तर त्याचा पुनर्विचार ही करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. शेतकरी सन्मान योजनेतही सुरुवातीला जे लाभार्थी होते. तेव्हाही लक्षात आलं होतं की मोठ्या शेतकऱ्यांना याचा लाभ मिळतोय. नंतर अनेक शेतकऱ्यांनीच सांगितलं आम्ही निकषात बसत नाही. त्याम ुळे जर लाडकी बहीण योजनेत जर काही महिला निकषाच्या बाहेर जात असतील तर त्याचा पुनर्विचार केला जाईल', पण योजनेचा सरसकट पुनर्विचार करण्याचं कारण नसल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

## महाराष्ट्र आता थांबणार नाही; पायाभूत, सामाजिक आणि उद्योग क्षेत्रात राज्य अग्रणी राहील - मुख्यमंत्री

**मुंबई** - मी मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघाचे आभार मानतो की आपण शपथविधीनंतर मला निमंत्रित केलं आणि आपण सर्वांनी माझं स्वागत केलं आणि सत्कार केला याबद्दल मी आभार मानतो. आपला हा संघ राज्याच्या संपूर्ण लोकशाहीचा महत्त्वाचा स्तंभ आहे. विधीमंडळातून राज्याचा कारभार चालतो तो योग्य प्रकारे चालला आहे की नाही हे सांगण्याचं काम तुम्ही सगळे करत असता असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. चुका झाल्यास ती निदर्शनास आणून देता, कधी कधी अशाही गोष्टी असतात की ज्या आम्हाला माहीत नसतात त्या जनतेपर्यंत पोहचतात, त्यानंतर आम्हाला या सगळ्यावर उत्तर द्यावं लागतं.

एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वातलं म हायुतीचं सरकार हे गतिशील असं सरकार होतं. आज आमची जी जाहिरात होती की महाराष्ट्र आता थांबणार नाही. त्याबाबत मला विचारलं की महाराष्ट्र आता थांबणार नाही म्हणजे काय त्यावर मी सांगितलं की महाराष्ट्राच्या विकासाने मागच्या अडीच वर्षात गती घेतली आहे. ही गती आता तशीच पुढे नेऊ. आता महाराष्ट्र थांबणार नाही. पायाभूत क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, उद्योग क्षेत्र प्रत्येक क्षेत्रात महाराष्ट्र अग्रणी राहिल असं मी आपल्याला सांगू इच्छितो असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

महायुतीतल्या आमच्या भूमिका बदलल्या आहेत एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते, मी आणि अजित पवार हे उपमुख्यमंत्री होतो. २०१९ ला ७२ तासांसाठी मी आणि अजित पवार उपमुख्यमंत्री होतो. आता पुन्हा मी मुख्यमंत्री आहे आणि अजित पवार, एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री आहेत. आमचे रोल बदलले असले तरीही दिशा ती राहणार आहे, गती तिच राहणार आहे. आमची जी पहिली मंत्रिमंडळाची बैठक झाली त्या बैठकीत आम्ही तिघांनीही अधिकाऱ्यांना सांगितलं की मागच्या काळात आम्ही आलो तेव्हा ५० ओव्हरची मॅच होती, अजित पवार आले तेव्हा २०-२० ची मॅच झाली, आता टेस्ट मॅच आहे त्यामुळे सगळे निर्णय योग्यपणे घेऊन आणि पुढची पायाभरणी योग्य प्रकारे करत आपल्याला वाटचाल करायची आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

विविध निर्णय आम्ही जे आधी घेतले होते ते पुढे सुरुच ठेवायचे आहेत. तसंच आमचा प्रयत्न हाच आहे जी आश्वासनं आम्ही दिली होती ती सुरुच ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. मी जनतेला आश्वस्त करु इच्छितो की लोकाभिमुख सरकार, सगळ्या समाजांना बरोबर घेऊन चालणारं सरकार महाराष्ट्रात असेल. अडचणी येतात पण अडचणींवर मात करत आपण वाटचाल करतो. मी आपल्या सगळ्यांचीही या प्रयत्नांमध्ये साथ मागतो आहे. आपल्या माध्यमातून म हाराष्ट्राच्या १४ कोटी जनतेला हे आश्वस्त करु इच्छितो की हे सरकार पारदर्शीपणे आणि जनतेसाठी काम करणार आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## शहर विद्रुपिकरणात भर घालणाऱ्या अनाधिकृत फलक, होर्डिंग, पोस्टर्सवर शहर मनपाची कारवाई

**जालना । प्रतिनिधी** - शहर विद्रुपिकरणात भर घालणाऱ्या अनाधिकृत फलक, होर्डिंग व पोस्टर्सवर शहर महानगर पालिकेच्यावतीने कारवाई करण्यात येत आहे. शहरातील ठिकठिकाणचे अनाधिकृत फलक जप्त करण्यात आले आहेत. एकूण २२ जणांविरोधात पोलीस ठाण्यात रितसर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया उशिरापर्यंत सुरु होती.

राज्यातील अनाधिकृत जाहीराती पोपणा फलक, होडींग व पोस्टर्स बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. १५५/२०११ मे. सुस्वराज्य फाऊंडेशन सातारा आणि इतर विरुध्द महाराष्ट्र राज्य आणि इतर या याचिकेवरील सुनावणीम ध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३१/०१/२०१७ रोजी विस्तृत निकाल दिलेला आहे. तसेच या प्रकरणात मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी वेळोवळी दिनांक ०९/१०/२०२४ व दिनांक १८/११/२०२४ रोजी अनाधिकृत फलक, हींग व पोस्टर्स विरोधात कार्यवाही करणे वावत आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. त्यानुसार जालना शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरीक / व्यवसायिक एजन्सीधारक

पान ३ वर





## संपादकीय पान



# महिलांचे उध्दारकर्ते

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन. आजच्याच दिवशी सण १९५६ साली डॉ बाबासाहेब आंबेडकर आपल्या लाखो अनुयायांना दुःखसागरात लोटून कायमचे निघून गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांना महापरिनिर्वाणदिनी विनम्र अभिवादन! डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी उभे आयुष्य दिन दलित, उपेक्षित, वंचित वर्गासाठी घालवले. या वर्गासाठी बाबासाहेबांनी जे कार्य केले ते तर सर्वानाच माहीत आहे पण डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महिला वर्गासाठी जे कार्य केले ते खूप कमी लोकांना माहीत आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उध्दारकर्ते आहेत पण दुर्दैवाने आजही देशातील अनेक महिलांना हे माहीतही नाही. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे कार्य केले ते याआधी कोणीही करू शकले नाही. आपल्या पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रिया या गुलामच होत्या. स्त्रियांना गुलामाचीच वागणूक मिळत होती. अगदी उच्चवर्णीय स्त्रिया देखील गुलामीचेच जीवन जगत होत्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांनंतर स्त्रियांनाच उपेक्षित मानत होते. मातोश्री रमाबाईला लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात महिलांच्या उन्नती व मुक्तीसाठी लढणारा मी योद्धा आहे. महिलांना या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी मी शेवटच्या क्षणापर्यंत लढेल. बाबासाहेबांनी त्यांचे बोल खरे करून दाखवले ते राज्यघटनेच्या माध्यमातून. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांना इतके अधिकार दिले की जे त्यांना हजारो वर्ष आणि ३३ कोटी देवताही देऊ शकले शकले नाही. पुरुषप्रधान संस्कृती आणि मनुवादी विचारसरणीमूळे ज्या महिलांना पुरुषांच्या पायाशी स्थान होते त्या महिला आज पुरुषांच्या बरोबरीने उभ्या राहत आहेत. भारतीय महिला आज जो मोकळा श्वास घेत आहेत तो केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घेत आहेत. यासाठी भारतीय महिलांनी डॉ बाबासाहेब आंबेडकरांना प्रातः स्मरणीय आणि वंदनीय मानले पाहिजे. नोव्हेंबर १९३८ मध्ये कुटुंब नियोजना संबंधीचे विधेयक डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नांमुळेच मुंबई विधिमंडळात आले होते. त्यांनी महिलांच्या हितासाठी व कल्याणासाठी कुटुंब नियोजनाचा मार्ग दाखवला. मुलं केंव्हा पाहिजे याचे स्वातंत्र्य त्यांनी महिलांना दिले. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री असताना त्यांनी महिला सक्षमीकरणाचे अनेक निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली. खान कामगार महिलेला प्रसूती भत्ता, कोळसा खाणीत काम करणाऱ्या महिलांना पुरुषां इतकिच मजुरी, बहूपत्नीत्वला कायद्याने बंदी, मजूर व कष्टकरी महिलांना २१ दिवस किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा, दुखापत झाल्यास नुकसान भरपाई आणि वैद्यकीय रजा, महिलांना पगारी प्रसूती रजा, २० वर्ष सेवा करुन निवृत्त झाल्यावर मरेपर्यंत निवृत्तिवेतन असे महिलांसाठी अनेक क्रांतिकारक निर्णय त्यांनी मजूर मंत्री असताना घेतले. बाबासाहेबांनी १९४७ साली कायदा मंत्री असताना हिंदू संहिता विधेयक अर्थात हिंदू कोड बिलाचा प्रस्ताव संसदेत मांडला. हे विधेयक क्रांतिकारी होते. हिंदू वैयक्तिक कायद्यात एकाच वेळी परस्परपूरक पुरोगामी तत्वे समाविष्ट करण्याचे हे क्रांतिकारक पाऊल होते. अस्पृश्यतेचे उच्चाटन, लग्नासंबंधातील स्त्री पुरुष समानता, नवऱ्याने केलेल्या अन्याय अत्याचाराविरोधात दाद मागण्याचा अधिकार, महिलांना घटस्फोट घेण्याचा अधिकार, वारसा हक्काचा लाभ महिलांनाही देण्याची तरतूद इत्यादी तत्वे या बिलात डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी समाविष्ट केली होती. डॉ बाबासाहेबांच्या मते सामाजिक न्यायचा लढा यशस्वी होण्यासाठी हिंदू समाजाचा वैयक्तिक कायद्यामध्ये जाती व्यवस्था आणि पुरुषप्रधानता यांना नकार देऊन समान वैयक्तिक संबंधांची पायाभरणी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने या विधेयकाला संसदेत प्रचंड विरोध झाला. सुरवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंचा या विधेयकाला पाठींबा होता पण काँग्रेसमधील सनातनी विचाराच्या नेत्यांनी या विधेयकाला प्रखर विरोध दर्शवल्यानंतर पंडित नेहरुंनी हे विधेयक मागे घ्यावे अशी विनंती बाबासाहेबांना केली. देशाची राज्यघटना बनवताना बाबासाहेबांनी जितकी मेहनत घेतली होती तितकीच मेहनत हे विधेयक बनवताना बाबासाहेबांनी घेतली होती. त्यामुळे बाबासाहेबांना खूप वाईट वाटले. हिंदू कोड बिलाला होणारा विरोध बाबासाहेबांसाठी खूप त्रासदायक ठरला शेवटी या मुद्द्यावरुन त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. कोणतीही चळवळ महिलांशिवाय पूर्ण होऊ शकत नाही, सामाजिक क्रांती करायची असेल तर त्यात महिलांचा समावेश असावाच असे बाबासाहेबांचे मत होते म्हणूनच त्यांच्या सर्व आंदोलनात महिलांचा समावेश होता मग ते १९२७ चे चवदार तळ्याचे आंदोलन असो की १९३० च्या नाशिकमधील काळाराम मंदिरातील आंदोलन असो. १९४२ च्या नागपुरातील महिला परिषदेत महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. लग्न हे मुलीच्या प्रगतीत अडसर ठरू नये. मुलीवर लग्न लादू नये ते तिच्या संमतीनेच व्हावे. लग्नानंतर बायको ही नवऱ्याची गुलाम नको मैत्रीण बनायला हवी. पतीच्या संपत्तीत पत्नी देखील समान वाटेकरी आहे. पत्नीच्या सुरक्षेची जबाबदारी पतीची असून तिला शारीरिक किंवा मानसिक त्रास जर पतीने दिला तर त्याला कायद्याने शिक्षा व्हायला हवी असे त्यांचे मत होते. भारतीय राज्यघटना लिहिताना डॉ आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम १४, १५, १५(३), १६(२), ३९(क), ३९(घ), ३९(ड), ४२, ३२५ इत्यादी कलमांचा अंतर्भाव करून महिलांचे हित व कल्याण जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्दैवाने देशातील महिला आजही बाबासाहेबांच्या या कार्याविषयी अनभिज्ञ आहेत. बाबासाहेबांचे भारतीय स्त्रियांवर अनंत उपकार आहेत. बाबासाहेबांनी महिलांसाठी इतके करून ठेवले आहे की अनेक जन्म घेऊनही हे उपकार फिटनार नाही.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांचा संक्षिप्त परिचय

**मुख्यमंत्री देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस**

जन्म : २२ जुलै, १९७०

जन्म ठिकाण : नागपूर

शिक्षण : एलएल.बी. (नागपूर विद्यापीठ तृतीय मेरिट), एम.बी.ए., डिप्लोमा इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट, डी.एस.ई. बर्लिन, जर्मनी येथून उत्तीर्ण

ज्ञात भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती अमृता.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगी).

व्यवसाय : सामाजिक कार्य.

पक्ष : भारतीय जनता पक्ष.

मतदार संघ : ५२ - नागपूर (दक्षिण-पश्चिम), जिल्हा - नागपूर.

इतर माहिती :



कार्यकारी सदस्य, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी (युनायटेड नेशन्सद्वारा मान्यता प्राप्त संस्था): उपाध्यक्ष, दि सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नाशिक (भोसला मिलिटरी स्कूल), उपाध्यक्ष, राष्ट्रीय अपंग कल्याण संस्था, अध्यक्ष, स्व. आबाजी थत्ते अनुसंधान संस्थानचे नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट, नागपूर; अध्यक्ष, नागपूर जिल्हा बास्केट बॉल संघटना, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे कार्य, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक, विविध उपक्रमात सहभाग.

१९८९ वॉर्ड अध्यक्ष, भारतीय जनता पक्ष, धरमपेठ वॉर्ड, नागपूर; १९९० प्रसिद्धी प्रमुख, भाजप, नागपूर (पश्चिम); १९९२-९५ अध्यक्ष, भाजप युवा मोर्चा, नागपूर शहर; १९९५-२००४ उपाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश, भारतीय जनता युवा मार्चा; २००४ - २००९, २००९ -२०१४ राष्ट्रीय उपाध्यक्ष, भारतीय जनता युवा मोर्चा; २००९ भाजप विदर्भ निवडणूक प्रमुख, २०१० महामंत्री, २०१२-२०१४ प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पक्ष; ग्लोबल पार्लमेंट या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधीत्व करणारे प्रथम भारतीय लोकप्रतिनिधी;

उपाध्यक्ष, ग्लोबल पार्लमेंट फोरम, हाबीतात; १९९२ व १९९७ नागपूर महानगर पालिका सदस्य व १९९७ मध्ये महापौर, महानगरपालिका, नागपूर; १९९८ मे अरइन कौन्सिल पद्धती अंतर्गत महाराष्ट्रातील प्रथम महापौर म्हणून निवड;

१९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९, २०१९-२०२४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, सदस्य, विधानमंडळ नियम समिती, सार्वजनिक उपक्रम समिती, विनंती अर्ज समिती, गृहनिर्माण व नगरविकास स्थायी समिती सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण समिती; सदस्य, कार्यकारी परिषद डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ; ओ.बी. सी, नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राची उत्पन्न मर्यादा वाढविण्यासाठी यशस्वी प्रयत्न; अध्यक्ष, निती आयोग शेती विषयक उच्चाधिकार समिती, भारत सरकार, राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेच्यावतीने सन २००३ या वर्षाचा महाराष्ट्र विधानसभेतील उत्कृष्ट संसदपटु पुरस्कार प्राप्तः 'उत्कृष्ट वक्ता' म्हणून राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त; रोटरी क्लबचा मोस्ट चॅलेंजिंग युथ ॲवार्ड प्राप्त, हिंदू लॉ विषयात नागपूर विद्यापीठाचा बी. के. बोस ॲवॉर्ड प्राप्त; प्रमोद महाजन यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा मुक्तचंद पुणे या संस्थे तर्फे उत्कृष्ट संसदपटु पुरस्कार, प्रकाश जोशी यांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या राजयोगी नेता पुरस्काराने सन्मानीत; राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कारांनी सन्मानीत.

यशदा, पुणे येथे अर्बन फायनान्सिंग विषयावर व्याख्याने दिली. ३१ ऑक्टोबर २०१४ ते २१ नोव्हेंबर, २०१९ महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, २२ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर, २०१९ दुसऱ्यांदा मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, डिसेंबर २०१९ ते जून २०२२ महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्ष नेते.

३० जून २०२२ रोजी उपमुख्यमंत्री पदाची शपथ, खाती -गृह, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, गृहनिर्माण, ऊर्जा, राजशिष्टाचार.

नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड, दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी तिसऱ्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ.

**उपमुख्यमंत्री एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे**

जन्म : ६ मार्च १९६४.

जन्म ठिकाण : अहिर, तालुका - महाबळेश्वर, जिल्हा - सातारा.

शिक्षण : बी.ए.

ज्ञातभाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती लता.

अपत्ये : एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय : उद्योग व सामाजिक कार्य

पक्ष : शिवसेना

मतदार संघ : १४७ - कोपरी - पाचपाखाडी, जिल्हा - ठाणे.

इतर माहिती :

ठाणे येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष, सन १९८६ मध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न आंदोलनात १०० कार्यकर्त्यांसह सक्रीय सहभाग, ४० दिवस बेल्लारी येथे तुरुंगवास सहन केला, संपूर्ण ठाणे शहर व जिल्ह्यात सामाजिक कार्याचे जाळे निर्माण केले; ठाणे शहरात ओपन आर्ट गॅलरी, सचिन तेंडुलकर मिनी स्टेडियम, इंटरनिटी सुविधा भूखंडावर बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक, शहिद हेमंत करकरे क्रीडा संकूल, जॉगिंग पार्क, सेंट्रल लायब्ररी सुरु केली; आदिवासी प्रभाग मोखाडा, तलासरी व जव्हार येथील आश्रम शाळेत व आरोग्य केंद्रात सकस आहार व आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन करुन गरीब रुग्णांना विनामुल्य औषध वाटप केले; पालघर, बोईसर व सफाळे परिसरात शिवसेने तर्फे एस.एस.सी. विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन, गरीब विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्यांचे वाटप, पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन, बाल नाट्य महोत्सवाचे व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, 'जाणताराजा' नाटकाचे अत्यल्पदरात आयोजन, अध्यक्ष, ठाणे जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन; उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स संघटना, पूरग्रस्तांना मदत,



ठाणे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व आधुनिकीकरणासाठी विशेष योगदान; एमएमआरडी सक्षम बनविण्यात यश, नागपूर - मुंबई समृध्दी महामार्ग, वांद्रे- वरळी सी लिंक, वाशी येथील तिसरा खाडीपुल, मुंबई -पुणे द्रुतगतीमार्गाची क्षमता वाढविण्यासाठी खालपूर-लोणावळा टनेल मार्ग, शिळ - कल्याण रस्त्याचे सहापदरीकरण, विदर्भात रेल्वेच्या २७ उड्डाणपूलाचे काम पूर्ण करण्यासाठी प्रयत्न; राज्यातील द्रुतगती मार्गावरील उपघात कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या; ओझर्डे येथे ट्रामा केअर सेंटर सुरू केले; आरोग्य मंत्रीपदाच्या काळात आशा सेविकांची पगार वाढ केली; आदिवासी व दुर्गम भागात काम करणाऱ्या बी.ए.एम.एस. पदवी धारक कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला.

ठाणे शहरातील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास केला; ठाणे मेट्रोच्या कामाला गती दिली; ठाणे-मुलुंड दरम्यान नव्या स्थानकाला मंजुरी मिळविली; ठाणे जिल्ह्यासाठी पाणी पुरवठा करणाऱ्या काळू धरणाच्या अडचणी सोडविण्यात यश; बारवी धरणाची उंची वाढविण्यासाठी मंजूरी मिळविली; एमएमआरडीला क्लस्टर योजना सुरू केली; ठाणे जिल्हा परिषद, तसेच कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, महानगरपालिकेत व अंबरनाथ, बदलापूर नगर परिषदेत शिवसेनेची सत्ता आणण्यात यश; १९८४ शिवसेना शाखा प्रमुख, वागळे इस्टेट, किसननगर; शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख; पक्षाच्या सर्व आंदोलनात सक्रिय सहभाग, १९९७ व २००२ दोन वेळा नगरसेवक, तीन वर्षे स्थायी समिती सदस्य, चार वर्षे सभागृह नेता, महानगरपालिका ठाणे.

२००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ २०१९-२०२४ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; २०१४-२०१९ विधीमंडळ शिवसेना पक्षाचे गट नेते; १२ नोव्हेंबर २०१४ ते ५ डिसेंबर २०१४ विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा; ५ डिसेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री; तसेच जानेवारी २०१९ सार्वजनिक आरोग्य खात्याचा कार्यभार व ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री; डिसेंबर २०१९ पासून शिवसेनेचे गट नेते; नोव्हेंबर २०१९ -जून २०२२ नगर विकास व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खात्याचे मंत्री.

३० जून २०२२ रोजी मुख्यमंत्रीपदाची शपथ. खाती - सामान्य प्रशासन, नगरविकास, माहिती तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, परिवहन, सामाजिक न्याय, पर्यावरण व वातावरणीय बदल, खनिकर्म आणि इतर नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड, दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ.

**उपमुख्यमंत्री अजित आशाताई अनंतराव पवार**

जन्म : २२ जुलै १९५९

जन्म ठिकाण : देवळाली प्रवरा, तालुका - राहुरी, जिल्हा - अहमदनगर.

शिक्षण : बी.कॉम.

ज्ञातभाषा :मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती : विवाहित, पत्नी श्रीमती सुनेत्रा.

अपत्ये :एकूण २ (दोन मुलगे).

व्यवसाय : शेती.

पक्ष : राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष.

मतदारसंघ : २०१ - बारामती, जिल्हा-पुणे,

इतर माहिती :

विश्वस्त, विद्या प्रतिष्ठान, बारामती; सदस्य, रयत शिक्षण संस्था, सातारा; संचालक, छत्रपती शिक्षण संस्था, भवानीनगर, तालुका इंदापूर; संचालक, श्री. छत्रपती सहकारी साखर कारखाना, लि. भवानीनगर; संचालक, माळेगाव सहकारी साखर कारखाना, लि. संचालक, सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, लि. जिल्हा पुणे, संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, मुंबई, संचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे; मार्च १९९१ ते ऑगस्ट १९९१ तसेच डिसेंबर १९९४ ते डिसेंबर १९९८ अध्यक्ष, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक; ११ डिसेंबर १९९८ ते १७ ऑक्टोबर १९९९ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई;



१९ डिसेंबर २००५ पासून संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ; संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, मुंबई; २८ सप्टेंबर २००६ पासून अध्यक्ष, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, मार्च २०१३ पासून अध्यक्ष, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, सप्टेंबर २००५ ते २३ मार्च, २०१३ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, १३ ऑगस्ट २००६ ते १९ ऑगस्ट २०१८ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन;

१७ जून १९९१ ते १८ सप्टेंबर १९९१ सदस्य, लोकसभा १९९१-९५ (पो.नि.), १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९, २०१९-२०२४ सदस्य, महाराष्ट्र विधान सभा; २८ जून १९९१ ते नोव्हेंबर १९९२ कृषी, फलोत्पादन व ऊर्जा खात्याचे राज्यमंत्री; नोव्हेंबर, १९९२ ते फेब्रुवारी, १९९३ जलसंधारण, ऊर्जा व नियोजन खात्याचे राज्यमंत्री; २७ ऑक्टोबर १९९९ ते २५ डिसेंबर २००३ पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे), फलोत्पादन खात्याचे मंत्री; २६ डिसेंबर २००३ ते ३१ ऑक्टोबर २००४ ग्रामविकास, पाणी पुरवठा व स्वच्छता, पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे) खात्याचे मंत्री; ९ नोव्हेंबर २००४ ते ७ नोव्हेंबर २००९ जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून), लाभक्षेत्र विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता खात्याचे मंत्री; ७ नोव्हेंबर, २००९ ते ९ नोव्हेंबर २०१० जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व ऊर्जा खात्याचे मंत्री; ११ नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१४ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन आणि ऊर्जा); २२ डिसेंबर ते २७ डिसेंबर २०१९ उपमुख्यमंत्री, डिसेंबर २०१९ - जून २०२२ उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन), काहीकाळ राज्य उत्पादन शुल्क या खात्याचा अतिरिक्त कार्यभार.

जुलै २०२३ मध्ये उपमुख्यमंत्रीपदाची शपथ, खाती - वित्त व नियोजन

नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड, दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ.

***

# महाराष्ट्र सरकार संविधानिक आहे काय ?

पाशवी बहुमत मिळवून महायुतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन होणार,पण ते संविधानिक आहे काय ? ईव्हीएम घोटाळा असो वा अचानक वाढलेली मते असोत मतांचे गणित जुळत नाही.निवडून आलेले आणि पराभूत झालेले उमेदवार त्यांना मिळालेल्या मतांबाबत साशंक बरोबर आश्चर्यचकित सुद्धा आहेत.निवडून येण्याची शाश्वती नसलेल्या काही उमेदवार निवडून आले हि कशाची कमाल आहे,जिंकून आलेल्यांची निधड्या छातीने आनंद हि साजरा करण्याची हिम्मत झाली नाही. प्रत्येकाचे मन नक्कीच खात असणार यात शंका नाही. ह्यामागे काळेबेरे असण्याची दाट शंका आहे.तशी शंका घेणेहि योग्य आहे.



काही उमेदवारांनी व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या मतदारांनी न्यायालयात व निवडणूक आयोगाकडे तपशीलवार पुरावा सादर केला.मतदानात अनेक ठिकाणी गैरप्रकार झाला हे उघड सत्य असताना निवडणूक आयोग त्याची निस्वार्थपणे अथवा पारदर्शीपणे खोलात जाऊन चौकशी का करत नाही ? निवडणूक आयोग जनतेच्या पैशातून फक्त सर्व सुखसुविधा ओरबाडून खुर्च्या उबवत राहणार आहे काय ?त्यांना जाब कोणी आणि कसा विचारायचा ह्याचा काही मार्ग आहे काय ? असल्यास त्याची अंमलबजावणी कधी होणार निवडणूक आयोगाला जनतेच्या प्रश्नाचे निरसन करणे कायदेशीर बंधनकारक नाही काय ?कोणीहि साम दाम दंड भेदाचा सत्तेचा,धनाचा दुरुपयोग करून सत्ता काबीज करून सत्ता राबवणार असेल तर निवडणुकांचा फार्स करून जनतेच्या कर रुपी पैशाचा चुराडा कशासाठी करायचा. अनैतिक मार्गाने पाशवी बहुमत मिळूनसुद्धा संविधानाच्या नियमाप्रमाणे तातडीने सरकार स्थापन का केले गेले नाही राज्यपाल महोदय ह्यांनी तसे आदेश का काढले नाहीत.राज्यपाल पदाला काही महत्व आहे कि नाही कि,राज्यपाल महोदय फक्त जनतेच्या कर रुपी पैश्यावर पाच वर्षे ऐश करणार काय ? संविधानाचा अपमान होतो आहे ह्याची त्यांना जाणीव नाही काय ?राज्यपालांनी राज्यात मतदानावरून शंकेचे काहूर उठले त्याची शहानिशा करण्याचे आदेश का दिले नाही. ज्यांनी मतदान केले त्या मतदारांचा अपमान नाही काय ? संशयरीतनित्या निवडून आलेल्या पक्षांना विद्यमान राज्यपाल सरकार स्थापनेसाठी गोपनीयतेची शप्पथ देणार ते त्यांच्या अंतर्मनाला पटणारे आहे काय?

राज्यपाल लोकशाही तत्वाची पायमल्ली करत आहेत म्हणून तेही गुन्हेगार नाहीत काय ?सत्ता जनसेवेसाठी कि वैयक्तित आर्थिक राजकीय स्वार्थासाठी आहे न्यायालयाबद्दल जनतेत शंका असल्यामुळे दाद मिळणार नाही अशीच निराशेची भावना जनमानसात आहे.नेते मंडळी हे निर्णय घेण्यात वैचारीकदृष्ट्या कमकुवत असतील तर ते व्हिडीओ कॉन्फरसिंग किव्वा फोन द्वारे सल्ला घेऊ शकतात.त्यासाठी सतत विमानाने दिल्ली वारी कशासाठी केली जाते.त्या प्रवासाचा खर्च सरकारी तिजोरीतून तर होत नाही ना ? जर तो होत असेल तर तो त्यांच्या पगार भत्यातून कापून घेण्याची कायदेशीर मार्गाने प्रशासनाने वसूल करावी व पगार,भत्ते सत्ता स्थापन झाल्यापासूनच द्यावी.सत्ता जनसेवेसाठी कि वैयक्तित आर्थिक राजकीय स्वार्थासाठी आहे ह्यावर कायदेतज्ज्ञांनी,राजकीय विश्लेषकांनी आपली परखड मते मांडून त्याची पूर्तता करण्यास भाग पाडले पाहिजे त्यासाठी निस्वार्थ,पारदर्शी न्यायालयात तातडीने न्याय मागायला हरकत नाही.सरकार हे लोकाभिमुख असावे ह्यासाठी प्रशासन त्यावर अंकुश ठेवू शकण्यास असमर्थ असतील तर न्यायालयाने हस्तक्षेप करून लोकशाहीची बूज राखत चुकलेल्या प्रशासनावर दंडात्मक कारवाई करावी कि जेणेकरून महाराष्ट्रात जो लोचट राजकारणाचा चिखल झाला त्याला आळा बसेल.कायदा आणि सुव्यस्थेचे राज्य आहे हे देशाला दिसेल.सरकार कोणाचेही स्थापन झाले तरी चालेल पण लोकशाहीची विटंबना करणारे नसावे.

**यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर (नवी मुंबई)**

# सेठ एकनाथ भगवानदास काबरा विद्यालयात परख परीक्षा संपन्न

## केंद्रप्रमुख रामकुमार खराडे यांनी परीक्षा केंद्राला दिली भेट



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील सेठ एकनाथ भगवानदास काबरा शाळेत इयत्ता सहावी व नववी च्या विद्यार्थ्यांनी आज ४ डिसेंबर रोजी परख राष्ट्रीय सर्वेक्षण २०२४ परीक्षा संपन्न झाली. या परीक्षेमध्ये ६० विद्यार्थी यांनी सहभाग नोंदविला. गट साधन जाफराबादचे केंद्रप्रमुख रामकुमार खराडे यांनी भेटीदरम्यान परख राष्ट्रीय सर्वेक्षण २०२४ एक देश व्यापी नमुना आधारित शैक्षणिक सर्वेक्षण असून प्राथमिक उद्दिष्टे म्हणून विद्यार्थ्यांचा शैक्षणिक परिणामाचे मूल्यमापन आणि मूल्यांकन करण्यासाठी मानदंड मानके आणि मार्गदर्शक तत्वे तयार करण्यासाठी होणार आहे माहितीशी अवगत केले. संबंधित परख राष्ट्रीय सर्वेक्षण २०२४ परीक्षासाठी निरीक्षक म्हणून व्ही एस भोसले, क्षेत्रीय अनुवेशक म्हणून जाफराबाद गट साधनचे मुकेश ओहाळ, व डी जे चेके यांनी काम पाहिले. सदरील परीक्षा केंद्राचे नियोजन मुख्याध्यापक ज्ञानेश्वर सुरुशे, ज्ञानेश्वर चव्हाण शिक्षक अनिल देशमुख, शकील तडवी, संतोष पवार, रविंद्र लंके, शिवकन्या काळे आदींनी पश्चिम घेतले.

# महिलांना सशक्तीकरण आणि सक्षमीकरणासाठी कौशल्य विकास संकल्प कार्यक्रम हाती घेणार - अविनाश राठोड

## १८ ते ५० वयातील महिलांना देणार मोफत व्यावसायिक प्रशिक्षण

**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील नायगाव सह बेलोरा,सासखेडा,खो.सावंगी, तळेगाव,गारटेकी ई अशा तालुक्यातील अनेक गावांना महिला सशक्तिकरण आणि सक्षमीकरणासाठीआपण प्रधानमंत्री कौशल्य विकास संकल्प योजना अंतर्गत महिलांना शिवणकाम,ब्युटी पार्लर,ई विविध मोफत व्यावसायिक १० दिवसाचे प्रशिक्षण देणार आहे.नायगाव येथील प्रशिक्षण हे ग्रामपंचायत कार्यालय किंवा जिल्हा परिषद त्रिंबक नाईक तांडा येथे आपण घेणार असल्याचे एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे राठोड यांनी सांगितले आहे.भारत सरकारने आपल्या देशातील महिला स्वबळावर स्वालंबी आणि सक्षम झाली पाहिजे यासाठी विविध व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण हाती घेतलेले आहेत. महिला सशक्तीकरणाचे ताजे उदाहरण म्हणजे गटाच्या माध्यमातून महिलांना लखपती दीदी बनवणे.जळगाव येथे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाखो लखपती दीदीचा सन्मान केला होता.

अशा केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना आपण तालुक्यात विविध गावात राबवणार आहोत.

या प्रशिक्षणाचे रजिस्ट्रेशन साठी महिलांनी आपले आधार कार्ड, बँकेचे पासबुक,२ पास फोटो आणि मोबाईल नंबर



देणे आवश्यक आहे.

तालुक्यात ज्या ज्या गावात प्रधानमंत्री कौशल्य विकास संकल्प योजना हा कार्यक्रम राबवायची असेल तर त्यांनी माझ्याशी संपर्क साधावा असे आवाहन अविनाश राठोड यांनी यावेळी केले आहे.सरपंच, उपसरपंच,ग्राम सेवक,शिक्षक इतर कर्मचारी आणि गावातील वरिष्ठांनी कौशल्य विकास कार्यक्रम हाती घ्यावा अशी विनंती या माध्यमातून राठोड यांनी केली आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त फेस ऑफ आंबेडकराईट मूव्हमेंटतर्फे एक वही एक पेन अभियान

**जालना । प्रतिनिधी -** विश्वरत्न परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त ऋ (फेस ऑफ आंबेडकराईट मूव्हमेंटच्या) च्या वतीने एक वही एक पेन अभियान राबविण्यासाठी नागसेन ग्रंथालय येथे शिरीष बनसोडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., जालना यांच्या अध्यक्षतेखाली व श्री. विनोद फकीरा वाघ यांच्या पुढाकाराने नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. श्री. शिरीष बनसोडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून दि. ०६ डिसेंबर, २०२४ रोजी होणाऱ्या एक वही एक पेन अभियाना संदर्भात माहिती देऊन कार्यक्रमाची रूपरेषा ठरवून दिली. जालना येथे या अभियानाचे २ रे वर्ष असून मागील वर्षी ३०० वहया व ३०० पेन नगर परिषद शाळा, टि. व्ही. सेंटर, जालना येथे वाटप करण्यात आल्या होत्या.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अनुयायी अभिवादन करण्यासाठी हार-फुले वाहून, मेणबत्ती प्रज्वलित करून आदरांजली वाहतात. यात कुठेही दैवतीकरणाचा भाव नसतो. ते दुसऱ्या दिवशी उपयोगाचे न राहता कचरा म्हणून वाया जाते. भा

सर्व सामाजिक दुखण्यांवर शिक्षण हेच प्रभावी औषध आहे असे स्वत: बाबासाहेब सांगून गेले आहेत. आज भारतात शिक्षणातून विद्यार्थी गळतीचे प्रमाण प्रचंड आहे. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवणे आवश्यक आहे. शेतकरी, कष्टकरी, कामगार हा पालक वर्ग असलेला विद्यार्थी शैक्षणिक सुविधा अभावी शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडत आहे. एकीकडे अभिवादनपर हारा फुलांचा खच पडतो आहे आणि दुसरी कडे आपले उद्याचे देशाचे भविष्य कोमेजून जाताना पाहणे अत्यंत वेदनादायक होत आहे. एक वही एक पेन या संकल्पनेनुसार, बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी आपण किमान २० रुपयांचा हार-फूल घेतो त्याला पूर्णपणे नाकारुन त्याच मूल्याचे एक वही व एक पेन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन म्हणून फॅम कडे जमा करा, फॅम ते सर्व साहित्य अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवेल. त्यांच्या शिक्षणाला तुमच्या वतीने हातभार लावेल. ते विद्यार्थी शिक्षित होतील. आयुष्यात मोठ्या पदांवर विराजमान होतील. बाबासाहेबांचे उच्चशिक्षित समाजाचे स्वप्न पूर्ण करतील ! ०६ डिसेंबर, २०२४ रोजी फॅम तर्फे हे अभियान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, मस्तगड, जालना येथे सकाळी ०७ वाजल्यापासून राबविण्यात येणार आहे. या अभिनव क्रांतिकारी उपक्रमात सहभागी होऊन एक वही एक पेन फॅम कडे जमा करण्याचे आवाहन विनोद वाघ यांनी केले. श्री. मिलींद कांबळे यांनी कार्यक्रमाचे सुत्र संचालन केले. श्री. विनोद भगत यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास श्री. राजेंद्र तुंबाकले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना, श्री. दामोधर घोरपडे, श्री. नंदकिशोर झीने, श्री. माधव वाघमारे, श्री. भगवान तायड, श्री. सदानंद खवले, श्री. प्रेमकुमार खिल्लारे, श्री. वसंत बनाटे, श्री. श्रीकृष्ण बकाल, श्री. सतिष गोरेल आदींची उपस्थिती होती.

# ५०० विद्यार्थ्यांनी साकारला श्री रामायणाचा बहारदार सोहळा

## श्री विद्या वर्धनी इंग्लिश मीडियम शाळेचा वार्षिक उत्सव



**शिवाजीनगर । प्रतिनिधी -** विद्या प्रसारिणी सभा पुणे अंतर्गत संचलित श्री विद्या वर्धनी इंग्लिश मीडियम स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त यंदा रामायण या थीमवर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात साधारण पाचशे विद्यार्थ्यांनी श्री रामायणाचा बहारदार सोहळा मोठा दिमाखात सादर केला. विद्यार्थ्यांची कलाकृती पाहून आलेल्या पाहुण्यांसह, शिक्षक व पालक देखील भारावून गेले होते.

श्री राम जन्म मोहोत्सवापासून, त्यांचे गुरुकुल मधील शिक्षण, सीता स्वयंवर, राम सीता लग्न सोहळा, वनवासमधील अनेक प्रसंग, शूर्पणखा, शबरी माताची ममता, सिताहरण, जटायु, श्रीराम भक्त बजरंगबली हनुमान, श्री राम सेतूचे निर्माण करून रावण वद आणि श्रीराम-सीता व लक्ष्मण यांचे आयोध्या आगमन आदी रामायणातील महत्त्वाचे सर्वच प्रसंग संगीतमय कलाकृतीने विद्यार्थ्यांनी साकारले होते.

विद्यार्थ्यांचे कौतुक व हा सोहळा पाहण्यासाठी विद्या प्रसारिणी सभेच्या चेअरमन डॉ मृणालिनी गरवारे, जॉईंट सेक्रेटरी विजय भुरके, डॉ. सुभाष मेहता, शाळेच्या प्राचार्या रेणू सुंबळी, तापरे सर, वर्षा क्षीरसागर, चंचल ललवाणी, नितीन गर्वा, गव्हर्नमेंट ॲडमिनिस्ट्रेशन ऑफिसर शिल्पकला रणदिवे, पुणे मनपा शैक्षणिक अधिकारी सेंडकर सर यांच्यासह शैक्षणिक क्षेत्रातील इतर मान्यवर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे नृत्य दिग्दर्शन राज शिरगावकर, प्रेम शिरगावकर व तुषार सागवेकर यांनी केले होते. सूत्रसंचालन ललिता जाधव तर आभार अनिकेत कलंगे यांनी मानले.

# ऋतुजा राजेश मालुसरे यांना इंग्लंड येथे मास्टर्स पदवी प्रदान

**मुंबई -** कु.ऋतुजा राजेश मालुसरे यांनी परदेशात उच्च शिक्षण घेत असताना इंग्लंड येथील न्यु कॅसल युनिव्हर्सिटी - टेने अपॉन, (इंग्लड) UK येथे मास्टर्स इन अर्बन प्लॅनिंग अँन्ड डेव्हलपमेंट या विषयात मास्टर्स ही पदवी प्राप्त केली आहे. युनिव्हर्सिटीमध्ये नुकत्याच पार पडलेल्या पदवीदान समारंभात Prof. Dame nne Johnson यांनी पदवीपत्र सन्मानपूर्वक प्रदान केले. याच युनिव्हर्सिटीत यापुढे ती असोसिएशट प्रोफेसर म्हणून रुजू होत आहे. ऋतुजाचे शालेय शिक्षण हॉली क्रास हायस्कूल परेल मुंबई, प्राथमिक शिक्षण बारावी सायन्स महर्षि दयानंद कॉलेज परेल मुंबई तर पदवी शिक्षण मनोहर फाळके आर्किटेक्ट कॉलेज मुंबई विद्यापीठ येथून घेतले आहे.

पान १ वरुन

### शहर विद्रुपिकरणात ...

यांना दि. ०३/१२/२०२४ रोजी जाहीर आवाहन करण्यात आले असुन सदर आवाहनामध्ये जालना शहर महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय तसेच जालना शहर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या जागे व्यतिरीक्त शहरात इतर कोणत्याही ठिकाणी विना परवाना जाहीरात फलक, होडींग व पोस्टर्स, बॅनर्स इत्यादी नावण्यात येऊ नये. तसे आढळल्यास संबंधिताविरूध्द दंड आकारून मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ तसेच महाराष्ट्र मालमत्तेच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम, १९९५ अन्वये फौजदारी स्वरूपाची कार्यवाही प्रस्तावित येईल असे बातमीपत्र प्रिसिध्द करण्यात आले होते. त्याअनुषंगाने मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय जालना शहर महानगरपालिका जालना यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष मोहिमव्दारे जा.श.म.पा. चे मालमत्ता विभाग व सर्व संबंधित स्वच्छता निरीक्षकांमार्फत जालना शहर हद्दीतील विविध हॉटेल्स, दवाखाने व इतर व्यावसायीक आस्थांपानांवर अशे एकुण २२ जणांवर रितसर पोलीस स्टेशनला गुन्हे नोंदविण्यात आले असुन दि.०४/१२/२०२४ रोजी रात्रीच्यावेळी उशीरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याची कार्यावाही करण्यात आली असुन जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली अनाधिकृत जाहिरात फलक लावण्या-यांविरुध्द हि विशेष मोहिम या पुढेही प्रभावीपणे चालु ठेवण्यात येत असुन अनाधिकृत होडींग्स, बॅनर, फ्लेक्स आढळुन आल्यास सदरचे होडींग जप्त करुन थेट गुन्हा दाखल करण्याची कारवाई म.न.पा. कार्यालयामार्फत करण्याचा ईशारा शहर मनपा प्रशासनाने दिला आहे.

# जिल्हा महिला व बाल रुग्णालयात सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी

## मराठा महासंघाचे जिल्हाधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सकांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील शासकीय जिल्हा महिला व बाल रुग्णालयाचा अनागोंदी कारभार सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना योग्य उपचार व सुविधा मिळवून देण्यात हे रुग्णालय अपयशी ठरत असून, रात्री शिकाऊ डॉक्टरांच्या भरोश्यावर रुग्णांना सोडले जात आहे. या प्रकारास मराठा महासंघाने तीव्र विरोध दर्शवून रुग्णालयातील अपुऱ्या सुविधा, मनुष्यबळाचा अभाव व डॉक्टरांच्या कारभारामुळे हे रुग्णालय केवळ रेफर सेंटर बनले असल्याचा आरोप केला आहे.

या संदर्भात गुरुवार दि. ५ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी आणि जिल्हा शल्य चिकित्सकांना मराठा महासंघाच्यावतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ग्रामीण भागातील रुग्ण मोठ्या आशेने जिल्हा व महिला बाल रुग्णालयात येतात. मात्र, आयसीयु नसल्याचे कारण पुढे करून, रुग्णांना औरंगाबादच्या घाटी रुग्णालयात रेफर केले जाते अथवा परिसरातील ओळखीपाळखीच्या खाजगी दवाखान्यात रेफर करण्याचा सल्ला दिला जातो. रुग्णालयात असलेल्या मोठ्या जागेत मंजूर १० बेड्सचा आयसीयु कक्ष कार्यान्वित करून तज्ज्ञ डॉक्टर व नर्सेसची तातडीने नियुक्ती झाल्यास ही समस्या सुटेल. रात्रीच्या वेळेस फक्त शिकाऊ डॉक्टरांच्या भरोशावर रुग्णालय चालवले जात असल्याने गंभीर रुग्णांना संभाजीनगर घाटी रुग्णालयात हलवावे लागते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दिवाळीपासून आतापर्यंत सहा ते दहा रुग्णांनी उपचाराअभावी प्राण गमावले आहेत. याला प्रशासनाची निष्क्रियता व रुग्णालयाच्या डॉक्टरांचा हलगर्जीपणा कारणीभूत ठरल्याचे महासंघाचे म्हणणे आहे.

दहा बेड्सचा आय सी यु कक्ष तातडीने सुरू करून तज्ज्ञ डॉक्टर व नर्सेसची नियुक्ती करून रुग्णसेवा सुधारावी, रुग्णांना बाहेर पाठवण्याऐवजी रुग्णालयातच उपचारांची सोय करावी, परिसरातील खाजगी दवाखान्यात रुग्ण पाठवण्याच्या प्रकरणांची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, रुग्णालयातील सुविधा व बेड्सची संख्या वाढवावी व रुग्णालयातील परिस्थिती सुधारण्यासाठी तातडीने



उपाययोजना करण्याची करावी. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर रुग्णहितासाठी तीव्र आंदोलन छेडावे लागेल, असा इशाराही महासंघाने दिला आहे.

निवेदनावर मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, युवक जिल्हाध्यक्ष ॲड. शैलेश देशमुख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आ.अर्जुनराव खोतकर यांच्या मंत्रिमंडळात समावेशासाठी छत्रपती फाउंडेशनचे सुनील रत्नपारखे यांनी रक्ताने लिहीले पत्र

**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना उपनेते, माजी मंत्री, आ. अर्जुनराव खोतकर यांचा मंत्रीमंडळात समावेश करावा अशी मागणी छत्रपती फाउंडेशनचे संस्थापक सुनील रत्नपारखे यांनी रक्ताने लिहीलेल्या पत्राद्वारे मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथराव शिंदे यांच्या कडे केली आहे.

गुरूवारी ( ता. ०५) एकनाथराव शिंदे यांना पाठवलेल्या पत्रात सुनील रत्नपारखे यांनी म्हंटले आहे की, मराठवाड्यातील शिवसेनेचे सर्वात ज्येष्ठ नेते, शिवसेना उपनेते,माजी राज्यमंत्री आ.अर्जुनराव खोतकर यांनी शिवसेना प्रमुख, हिंदूह्रदहय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या राष्ट्रभक्ती, हिंदुत्ववादी, विचारांनी प्रभावित होऊन मागील चाळीस वर्षांपासून जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात शिवसेना पक्षाचे संघटन बळकट केले. जालना विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतांना मंत्री पदासह पदावर नसतांना ही जालना शहर आणि ग्रामीण भागात कोट्यवधी रुपयांचा निधी खेचून आणत मोठ्या प्रमाणात विकासकामे पूर्ण केली. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सलग आठव्यांदा पक्षाने उमेदवारी दिल्यानंतर जनतेने विक्रमी मताधिक्याने त्यांना विजयी केले.

सर्व जाती- धर्मातील जनतेला सोबत घेऊन त्यांच्या न्याय हक्कासाठी प्रयत्नशील असलेल्या आ. अर्जुनराव खोतकर यांना मंत्रीमंडळात स्थान द्यावे अशी मागणी छत्रपती फाउंडेशनचे संस्थापक सुनील रत्नपारखे यांच्या सह विविध सामाजिक संघटनांच्या वतीने करण्यात आली.यावेळी लहुजी शक्ती सेनेचे युवा प्रदेशाध्यक्ष सचिन क्षीरसागर, साहित्यरत्न फेस्टिवलचे संकल्पक अंकुश राजगिरे, कृ. उ. बा. स.चे संचालक तथा युवा सेना तालुका प्रमुख राहुल गवारे, युवा सेना तालुका सरचिटणीस रवींद्र ढगे, छत्रपती फाउंडेशनचे सचिव निरंत पट्टेबहादूर, प्रशांत खरात , विकास सरकटे, ज्ञानेश्वर सोनवणे आदींची उपस्थिती होती.



# जाफराबाद तहसीलदारांची वाळू माफियावर कारवाई

## वाळुमाफियांचे धाबे दणाणले; तेवीस ब्रास वाळूसह हायवा जप्त







**दत्ता देशमुख**

**जाफ्राबाद** - येथील तहसीलदार, डॉक्टर सारिका भगत धडाकेबाज कारवाई मध्ये, अवैध वाहतूक करणारा वाळवा व एक तेवीस ब्रास वाळू जप्त करण्यात आली. विशेष म्हणजे जाफराबाद तहसीलने विशेष मोहीम राबवण्यात आलेली आहे. मंडळ अधिकारी तलाठी अधिकारी व विशेष अधिकारी नेमून विशेष पथक नेमण्यात आलेले आहेत. या पथकांचे नेतृत्व स्वतः तहसीलदार डॉक्टर सारिका भगत या करतात. अशाच एका पथकांचे नेतृत्व करत असताना. अवैध वाळू वाहताना एक हायवा दिसला. त्यावर वाळू घेऊन जाणाऱ्या वाहिवाला पकडण्यात आले. त्यातील २३ ब्रास वाळू ही जप्त करण्यात आली असून, पुढील कारवाईसाठी हायवा हा संबंधीत पोलीस स्टेशन मध्ये जमा करण्यात आलेला असून पुढील कारवाई जाफराबाद पोलीस स्टेशनचे पीआय इंगळे साहेब व त्यांची टीम करत आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे वाळू माफिया धाबे दणाणलेले असून, ही कारवाई डॉक्टर सारिका भगत यांच्या नेतृत्वात मंडळ अधिकारी व्यंकट इंगोले, तलाठी अण्णा कड, तसेच पथकातील इतर अधिकाऱ्यांनी केली असून, रात्रीच्या गस्तीमध्ये असे अनेक अवैध वाळू वाहत असल्याचे निदर्शनात येत असल्यामुळे अशा अवैध वाहतुकीकडे तहसील ऑफिसचे विशेष लक्ष राहणार असल्याचे विशेष सूत्रांनी सांगितले.

# कलश सिड्सच्या विहीरीला गावकऱ्यांचा तीव्र विरोध

## ग्रामपंचायतीच्या सार्वजनिक विहीरीजवळच विहीर खोदण्याचा कलशचा प्रयत्न



**जालना | प्रतिनिधी -** तालुक्यातील गोलापांगरी येथील गावकर्यांना पाणी पुरवठा करणार्या सार्वजनिक विहीरीजवळ कलश या खाजगी कंपनीने विहीर खोदून पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताला बाधा निर्माण केल्याने गावकर्यांनी त्या विहीरीला तिव्र विरोध केलाय. त्यामुळे गावकऱ्यांनी गुरुवार दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता निवासी उप जिल्हाधिकारी यांना निवेदन दिलंय.

गोलापांगरी येथील गावकऱ्यांना पाणी पुरवठा करण्यासाठी एक सार्वजनीक विहीर असून त्या विहीरी शेजारीच कशल सिड्स या खाजगी कंपनीने शेतजमीन खरेदी करुन त्यात विहीर खोदण्यास सुरुवात केली. त्या विहीरीमुळे सार्वजनीक विहीरीच्या पाण्यावर परिणाम होत असल्याचे गावकऱ्यांनी म्हटलंय. सदरील विहीरीचे काम थांबविण्यात यावे यासाठी ग्राम पंचायतीने विरोध केला असून जिल्हा प्रशासनाला या पुर्वीच पत्र दिले होते. तरीही कंपनीकडून विहीर खोदण्याचा प्रयत्न सुरुच आहे. कलश सिड्स कंपनीने ग्रामपंचायत आणि गावकर्यांनाही जुमानले नसल्याचे तक्रारीत म्हटलंय. कलश सिड्स कंपनीने विहीर खोदून गावकर्यांच्या पिण्याच्या पाण्यास बाधा निर्माण केल्याने ग्राम पंचायत आणि गावकर्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठून खाजगी कंपनीच्या विहीरीचे काम रोखण्याची मागणी केली.

यावेळी सरपंच आसराबाई खडेकर, संतोष खडेकर, विनोद खरात, मन्सुर पठाण, अरुण जाधव, रामेश्वर जर्हाड, रुपेश उमप, अन्वर शेख यांच्यासह महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.